मुंबई, गुरुवार, १४ मार्च २०२४ | वर्ष : ३६ अंक : ५१ | पृष्ठे १० | मूल्य : ५.०० रुपये | ★★ शहर आवृत्ती
संस्थापक संपादक : बाळ ठाकरे
ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

## विविध

गुरुवार, दि. १४ मार्च २०२४

### भटक्या प्राण्यांच्या संगोपनासाठी काय उपाययोजना करणार?

मुंबई : भटक्या प्राण्यांच्या संगोपनाबाबत मिंधे सरकार उदासीन असल्याचे बुधवारी निदर्शनास येताच उच्च न्यायालयाने संताप व्यक्त केला. न्यायालय सांगणार तेव्हाच तुम्ही कृती करणार का? प्राणी कल्याण मंडळ कशासाठी नेमलेय? या मंडळाला आपली जबाबदारी ठाऊक नाही का? अशी प्रश्नांची सरबत्ती करीत न्यायालयाने मिंधे सरकारचे कान उपटले. तसेच भटक्या प्राण्यांच्या संगोपनासाठी काय उपाययोजना करणार, याबाबत दोन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश सरकारला दिले. पनवेलच्या आसुडगाव गोशाळेत प्राण्यांचा सांभाळ करणाऱ्या गोवंश रक्षण संवर्धन संस्थेने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. नवी मुंबईतील भटक्या प्राण्यांच्या संगोपनाच्या गंभीर प्रश्नाकडे याचिकेतून न्यायालयाचे लक्ष वेधले आहे. या याचिकेवर बुधवारी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्या संस्थेतर्फे ॲड. हरीश पंड्या, ॲड. सिद्ध विद्या व ॲड. शलाका कारकर यांनी बाजू मांडली.



Scanned with OKEN Scanner